## शरीररचनाशास्त्र विभाग
## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ

**मृत्यूनंतर संपूर्ण देहदान करू इच्छिणाऱ्या दात्यांसाठी माहिती**

१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ अध्यापन आणि वैज्ञानिक संशोधनासाठी मृत्यूनंतर देहदानाचा स्वीकार करण्यात येतो.

२. देहदान करू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी निर्णय घेण्यापूर्वी आपली इच्छा जवळचे नातेवाईक, डॉक्टर आणि संबंधित व्यक्तींशी चर्चा करून सांगावी.

३. देहदान विनंती अर्ज (BODY DONATION REQUEST FORM) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथच्या वेबसाईटवर किंवा शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ येथे उपलब्ध आहे.

४. दात्याने भरलेला देहदान विनंती अर्ज नोंदणीसाठी शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ यांच्या कार्यालयात जमा करावा.

५. देहदान विनंती अर्ज नोंदणीच्या वेळी सादर करावयाची कागदपत्रे:
 अ. जवळच्या नातेवाईकाच्या संमतीसह रीतसर भरलेला देहदान विनंती अर्ज.
 ब. पासपोर्ट आकाराचा फोटो.
 क. दात्याचा पत्त्यासह ओळख पुरावा (आधार कार्ड).

६. नोंदणी न केलेल्या देहदानाचाही (UNREGISTERED DONATIONS) शरीररचनाशास्त्र विभागाकडून स्वीकार केला जाईल.

७. दात्याच्या मृत्यूनंतर, शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ यांना मृत्यूची माहिती देणे आणि देहदानाच्या प्रक्रियेबाबत शरीररचनाशास्त्र विभागातील प्राध्यापकांशी चर्चा करणे ही दात्याच्या नातेवाईकांची जबाबदारी आहे.

८. जर देहदानाचा स्वीकार झाला, तर मृताच्या कुटुंबीयांना देह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ येथे आणण्याची विनंती केली जाते.

९. कृपया नोंद घ्या की, दात्याला खालीलपैकी काही आजार/स्थिती असल्यास देहदानाचा स्वीकार केला जाणार नाही: एचआयव्ही (HIV), संसर्गजन्य हिपॅटायटीस (infective hepatitis), सक्रिय क्षयरोग (active tuberculosis), सेप्सिस (sepsis), गॅस गॅंगरीन (gas gangrene), टिटॅनस संसर्ग (tetanus infection), कुजलेले मृतदेह, कोविड-१९ (COVID-१९) पॉझिटिव्ह, रस्ते अपघातानंतरचे मृत्यू, वैद्यकीय-कायदेशीर प्रकरणे (medico-legal case) किंवा इतर कोणत्याही प्रकारचे अनैसर्गिक मृत्यू.

१०. असे मृतदेह वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी आणि ते हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करतात.

Scanned with OKEN Scanner

११. मृताच्या कोणत्याही नातेवाईकाने/मित्राने मृत्यूच्या वेळी शरीररचनाशास्त्र विभागातील प्राध्यापकांशी या प्रकरणावर चर्चा करावी, अशी विनंती आहे.

१२. मृत्यूचे कारण आणि मृतदेहाची स्थिती इत्यादी माहितीबद्दल प्राध्यापकांचे समाधान झाल्यानंतरच देहदान स्वीकारले जाईल.

१३. कायदेशीर वारस / जवळचे नातेवाईक यांनी मृतदेह सुपूर्द करताना सादर करावयाची कागदपत्रे (नोंदणीकृत दाते आणि नोंदणी न केलेले दाते):

अ. नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाने दिलेले मृत्यूचे कारण सांगणारे वैद्यकीय प्रमाणपत्र (मृत्यू प्रमाणपत्र - Death certificate) (मूळ आणि प्रत).Form No ४ या स्वरूपात देण्याचे आहे

ब. मृत दात्याचा ओळख पुरावा (आधार कार्डपॅनकार्ड इ.

क. मृतदेह सुपूर्द करताना उपस्थित असलेल्या मृताच्या कायदेशीर वारसांचे/जवळच्या नातेवाईकांचे संमतीपत्र आणि ओळख पुरावा (आधार कार्ड).

१४. मृतदेह सोमवार ते शुक्रवार सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत शरीररचनाशास्त्र विभागात आणावा.

१५. मृत्यूची माहिती शक्य तितक्या लवकर शरीररचनाशास्त्र विभागाला द्यावी, जेणेकरून विभाग मृतदेहावर पुढील प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करू शकेल.

१६. नातेवाईकांना विनंती आहे की त्यांनी मृतदेह शरीररचनाशास्त्र विभागात आणण्यासाठी स्वतः आवश्यक ती व्यवस्था करावी.

१७. मृतदेहाचा तत्काळ वापर केला जाऊ शकतो, भविष्यातील वापरासाठी काही काळासाठी जतन केले जाऊ शकते किंवा हाडे काढण्यासाठी (maceration) ठेवले जाऊ शकते.

१८. पूर्ण वापरानंतर, अवशेषांची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावली जाईल.

१९. शरीररचनाशास्त्र विभागातील प्राध्यापकांच्या मान्यतेशिवाय थेट विभागात आणलेले मृतदेह स्वीकारले जाणार नाहीत.

२०. मृत्यु नंतर खालील अध्यापकांशी देहदानासंबंधी त्वरीत संपर्क साधावा.

१. डॉ. जेबा खान - ९९२०५१८४८१

२. डॉ. सचिन यादव - ८६५२६२०९२५

३. डॉ. अश्विनी मुल्या ९८१९५१३९८५

Scanned with OKEN Scanner

**वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ)**

**१. संपूर्ण देहदान म्हणजे काय?**

संपूर्ण देहदान म्हणजे एखाद्या व्यक्तीने मृत्यूनंतर आपला देह स्वेच्छेने वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनासाठी मान्यताप्राप्त वैद्यकीय संस्थेला दान करणे. हे दान कोणाच्याही सक्तीने न होता व्यक्तीच्या स्वतःच्या इच्छेने व्हायला हवे.

**२. स्वेच्छेने केलेले संपूर्ण देहदान कायदेशीर आहे का?**

होय, हे 'ॲनाटॉमी ॲक्ट'

(BOMBAY ANATOMY ACT १९४९) द्वारे नियंत्रित केले जाते.

**३. अवयवदान आणि देहदान एकच आहे का?**

नाही! अवयवदान हे ब्रेन डेथ (Brain death) नंतर गरजू रुग्णाला प्रत्यारोपणासाठी निरोगी अवयव किंवा ऊती काढण्यासाठी केले जाते. देहदानात, व्यक्तीच्या मृत्यूनंतर संपूर्ण देह दान केला जातो. शरीररचनाशास्त्र विभागाला दान केलेला देह कधीही अवयवदानासाठी वापरला जात नाही.

**४. अनेक अवयव दानासाठी (multi-organ donation) वापरलेला देह संपूर्ण देहदानासाठी स्वीकारला जाऊ शकतो का?**

नाही.

**५. मी देहदानाचा विचार का करावा?**

देहदान हे एक उदात्त कार्य आहे. दान केलेल्या देहांचा वापर वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आणि प्रशिक्षित करण्यासाठी केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान विकसित होण्यास मदत होते आणि संशोधनातून विविध वैद्यकीय समस्यांवर उपाय शोधले जातात.

**६. देहदान कोण करू शकते?**

कोणताही भारतीय नागरिक ज्याचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त आहे आणि जो कायदेशीरदृष्ट्या वैध संमती देण्यास पात्र आहे, तो देहदान कार्यक्रमांतर्गत स्वतःची नोंदणी करू शकतो. यासाठी कोणतीही कमाल वयोमर्यादा नाही. शरीराचे वजन ७५ किलोपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. जर मृत व्यक्तीने नोंदणी केलेली नसेल, तर जवळचे नातेवाईक/पालक/कायदेशीर ताबा असलेली व्यक्ती देहदान करू शकते.

**७. (अ) नोंदणीकृत दाता आणि (ब) नोंदणी न केलेला दाता म्हणजे काय?**

नोंदणीकृत दाता तो आहे जो स्वतः देहदान विनंती अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे जमा करून नोंदणी करतो. नोंदणी न केलेला दाता तो आहे ज्याने स्वतः नोंदणी केलेली नसते, परंतु मृत्यूनंतर जवळचे नातेवाईक/कायदेशीर वारस दात्याच्या इच्छेनुसार पत्र आणि कागदपत्रे सादर करून देहदान करतात.

**८. स्वतःची नोंदणी कशी करावी?**

देहदान करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने शरीररचनाशास्त्र विभागात देहदान विनंती अर्ज भरून जमा करावा. या अर्जामध्ये दात्याचे आणि जवळच्या नातेवाईकांचे संमतीपत्र असते.

**९. एखाद्या व्यक्तीने देहदान फॉर्म भरला नसेल तरीही तिचा/त्याचा देह दान करता येतो का?**

होय. जवळचे नातेवाईक/कायदेशीर वारस दानाचा हेतू सांगणारे पत्र आणि आवश्यक कागदपत्रे सादर करून देहदान करू शकतात.

Scanned with OKEN Scanner

**१०. दात्याच्या (नोंदणीकृत किंवा नोंदणी न केलेल्या) मृत्यूनंतर कोणती प्रक्रिया करावी?**

शरीररचनाशास्त्र विभागाला मृत्यूची माहिती द्या. विभागाचे प्राध्यापक मृत्यूचे स्वरूप आणि मृत व्यक्तीबद्दल काही प्रश्न विचारतील. प्राध्यापकांचे समाधान झाल्यास, मृतदेह सुपूर्द करण्यापूर्वी नातेवाईकांना खालील कागदपत्रे सादर करण्यास सांगितले जाईल:
अ) मृतदेह दान करण्याचा हेतू सांगणारा संमती अर्ज.
ब) नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाकडून मिळालेले मृत्यूचे कारण सांगणारे प्रमाणपत्र (मृत्यू प्रमाणपत्र) आणि दाखवण्यासाठी मूळ प्रमाणपत्र.
क) मृत दात्याचा आणि मृतदेह सुपूर्द करणाऱ्या जवळच्या नातेवाईकाचा ओळख पुरावा (मतदार ओळखपत्र/आधार कार्ड).
टीप: मृत्यू रुग्णालयात झाल्यास रुग्णालय प्रमाणपत्र देईल. मृत्यू घरी झाल्यास, मृत्यू घोषित करण्यासाठी आणि योग्य स्वरूपात प्रमाणपत्र (लेटरहेडवर नाही) देण्यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाला घरी बोलावणे आवश्यक आहे.

**११. मृत्यूनंतर देह कसा सुपूर्द करावा?**

मृताच्या नातेवाईकांनी कामाच्या वेळेत (सोमवार ते शुक्रवार: सकाळी ९ ते सायं ४) स्वतःच्या वाहनाची व्यवस्था करून मृतदेह शरीररचनाशास्त्र विभागात आणावा.

**१२. कोणत्या परिस्थितीत देहदान नाकारले जाते? / कोण देहदान करू शकत नाही?**

दात्याला खालील आजार असल्यास देहदान स्वीकारले जात नाही: कोविड-१९, एचआयव्ही/एड्स, हिपॅटायटीस बी किंवा सी, क्षयरोग, प्रियन रोग (Prion Disease), गंभीर दुखापत, सर्व मेडिको-लीगल प्रकरणे (उदा. जळणे, आत्महत्या, खून, रस्ते अपघात, बुडणे), अत्यंत कुजलेला मृतदेह, बेडसोर्स (Bed sores), डायबेटिक अल्सर, सेप्टिसीमिया (Septicemia) किंवा मृताच्या जवळच्या नातेवाईकांचा दानाला आक्षेप असल्यास.

**१३. मृत्यूनंतर किती वेळेत मृतदेह शरीररचनाशास्त्र विभागाकडे सोपवावा?**

मृत्यूनंतर ६ तासांच्या आत मृतदेह विभागात पोहोचणे आवश्यक आहे, कारण मृत्यूनंतर लगेच कुजण्याची प्रक्रिया सुरू होते.

**१४. पोस्टमार्टम (Post-mortem) शवविच्छेदनानंतर देहदान करता येते का?**

नाही. पोस्टमार्टम झालेल्या कोणत्याही मेडिको-लीगल प्रकरणात संपूर्ण देहदान स्वीकारले जात नाही.

**१५. अध्यापन किंवा संशोधनासाठी देह कसा जतन केला जातो?**

फॉर्मालीन (Formalin) आधारित संरक्षक द्रावणाने देहावर रासायनिक प्रक्रिया केली जाते. यामुळे ऊती सुरक्षित राहतात आणि देह कुजण्यास प्रतिबंध होतो. या प्रक्रियेला 'एम्बाल्मिंग' (embalming) म्हणतात, ज्यामुळे देह अनेक वर्षे जतन करता येतो.

**१६. वापरानंतर देहाची विल्हेवाट कशी लावली जाते?**

देहाच्या अवशेषांची पूर्ण संवेदनशीलतेने आणि अत्यंत आदराने वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावली जाते.

**१७. देहाचा वापर झाल्यानंतर अवशेष/अस्थी नातेवाईकांना परत मिळू शकतात का?**

नाही. हे शक्य नाही.

**१८. दानानंतर नातेवाईक मृतदेह पाहू शकतात का?**

एकदा देहदान केल्यावर नातेवाईक तो पाहू शकत नाहीत.

**१९. मृताचा मुलगा किंवा मुलगी यांच्यापैकी कोणीतरी दानाला सहमत नसेल, तर तरीही देहदान करता येते का?**

नाही. सर्व कायदेशीर वारस/जवळचे नातेवाईक एकमताने निर्णय घेत नाहीत तोपर्यंत देह स्वीकारला जाणार नाही. कायदेशीर गुंतागुंत टाळण्यासाठी एकमत आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

**२०. मी माझी देहदानाची नोंदणी नंतर कधीही मागे घेऊ शकतो का?**

होय. तुम्ही कधीही तुमची नोंदणी मागे घेऊ शकता.

**२१. मी नोंदणीकृत दाता आहे. मृत्यूनंतर माझे जवळचे नातेवाईक माझा देह देण्यास आक्षेप घेऊ शकतात का? / कोणीही माझी संमती रद्द करू शकतो का?**

होय. व्यक्तीने नोंदणी केली असली तरी, अंतिम संमती मृताच्या जवळच्या नातेवाईकांनी/कायदेशीर वारसाने देणे आवश्यक असते. त्यामुळे दात्याने आपल्या इच्छेबद्दल नातेवाईकांशी चर्चा करणे महत्त्वाचे आहे.

**२२. देहदानानंतर नातेवाईकांना कोणती कागदपत्रे दिली जातात?**

देहदानानंतर, संस्थेच्या सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी असलेले देहदानाबद्दलचे पोचपावती आणि कौतुक प्रमाणपत्र शरीररचनाशास्त्र विभागाकडून दिले जाते.

**२३. अनाथ व्यक्ती किंवा वृद्धाश्रमातील व्यक्ती (ज्यांचे कोणी नातेवाईक/कायदेशीर वारस नाहीत) यांचे देहदान शक्य आहे का?**

नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अंबरनाथ यांच्या सौजन्याने.

Scanned with OKEN Scanner

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अंबरनाथ येथे गठित केलेल्या देहदान समितीची माहिती.**

| अ.क्र. | नाव | पदनाम | समितीचे पद |
|---|---|---|---|
| १. | डॉ. संतोष वर्मा | अधिष्ठाता | अध्यक्ष |
| २. | डॉ. रमेश गढरी | प्राध्यापक,न्यायवैद्यकशास्त्र | उपाध्यक्ष |
| ३. | डॉ. प्रसाद कुलकर्णी | प्राध्यापक,शरीररचनाशास्त्र | सदस्य सचिव |
| ४. | डॉ. झेबा खान | सहयोगी प्राध्यापक,शरीररचनाशास्त्र | सदस्य |
| ५. | डॉ. अश्विनी मुल्या | सहाय्यक प्राध्यापक,शरीररचनाशास्त्र | सदस्य |
| ६. | श्री. जनक जोशी | मुख्य प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| ७. | चि. दिनेश महाजन | लिपीक | सदस्य |
| ८. | श्री. जयंत जोग | दधिची देहदान मंडळातर्फे | सदस्य |
| ९. | श्री. सत्यवान सुरवसे | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | सदस्य |

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अंबरनाथ यांच्या सौजन्याने.

Scanned with OKEN Scanner